महाराष्ट्र टाइम्स
# ठाणे विशेष
११ मार्च २०१५
thane.mtonline.in











## विद्युल्लता...



आपल्या कामातून समाजात आगळेवेगळे स्थान निर्माण करणाऱ्या महिलांची कर्तबगारी पाहण्याची संधी फोटो सर्कल सोसायटी या ठाण्यातील छायाचित्रकारांच्या प्रसिद्ध संस्थेतर्फे व विवियाना मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्युल्लता' या छायाचित्र प्रदर्शनातून यंदाही मिळणार आहे. विवियाना मॉल येथे बुधवारी सकाळी ११ ते ९ या वेळेत हे प्रदर्शन पाहता येईल. या छायाचित्र प्रदर्शनात पूर्वांचल येथील १४ महिला व महाराष्ट्रातील ४ महिलांचा समावेश आहे. यात पूर्वांचल येथील जेसिम्मा सुचियाड, एप्रिलदा बारे, तेरेसा खोडर्थी, फोर्सिला डखार, मीरा डखार, कोंग ड्रीम (ड्रीमसिबोन खारकोंगोर), बिरुबाला राभा, जोनाकी बारो, अरुणी हिगिओ, पद्मश्री डॉ. बिन्नी यांगा (माया), आईनी तालोड, ओ इंदिरा ओइनाम, शीलारमणी, डॉ. जामिनी देवी यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सुनिता पाटील, अहिल्या महिला मंडळ (पेण), रजनी परांजपे, प्रिती पाटील यांचा समावेश आहे.